# मिरा भाईंदर महानगरपालिका
## स्थायी समिती सभा दि. ०५/१२/२००६

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा मंगळवार दिनांक ०५/१२/२००६ रोजी सभा सुचना क्र. २२ दि. ३०/११/२००६ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणावर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

### उपस्थित सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. स्टीवन जॉन मेंन्डोंसा | सभापती |
| २) | श्री. तुळशीदास दत्तु म्हात्रे | सदस्य |
| ३) | श्री. जयंत महादेव पाटील | सदस्य |
| ४) | श्री. ध्रुवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| ५) | श्रीम. ग्रिटा स्टीफन फॅरो | सदस्या |
| ६) | श्रीम. डिसोझा ज्युडी थॉमस | सदस्या |
| ७) | श्री. शफिक अहमद खान | सदस्य |
| ८) | श्री. रमेश धरमचंद्र जैन | सदस्य |
| ९) | श्री. रतन कृष्णा पाटील | सदस्य |
| १०) | श्री. रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |
| ११) | श्रीम. गिता भरत जैन | सदस्या |
| १२) | श्रीम. जेन्वी युस्टस आल्मेडा | सदस्या |
| १३) | श्री. रोहिदास शंकर पाटील | सदस्य |
| १४) | श्री. हंसु कमलकुमार पांडे | सदस्य |
| १५) | श्री. शशिकांत जगन्नाथ भोईर | सदस्य |

### गैरहजर सदस्य

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. परशुराम पद्माकर म्हात्रे | सदस्य |

**मा. सभापती सो. :-**

सन्मा. सदस्य आजची सभा चांगल्या खेळीमेळीच्या वातावरणात पार पडेल अशी आशा बाळगतो. व सभा चालवण्यासाठी सचिव साहेबांना पुढील आदेश देत आहे.

(नगरसचिवांनी विषय पत्रिकेचे वाचन केले.)

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १४४ चे वाचन केले.)

**नगरसचिव :-**

मी प्रथम दि. १७/०८/२००६ रोजीच्या इतिवृत्तांताचे वाचन करतो.

**जेन्वी अल्मेडा :-**

पान क्रं. १३चे रिपिटेशन आहे. पान क्रं. २२ वर सेम रिपिटेशन आलेले आहे. जरा दुरूस्ती करुन घ्या.

**नगरसचिव :-**

पान क्रं. १५ ते २४ वर कोणता दुरूस्ती सुचवायची असेल तर सांगा.

**शशिकांत भोईर :-**

पान नं. २१ वर आपण ठराव मंजूर केलेला. वरीलप्रमाणे महसुल उत्पन्नात घट होणार आहे की इमारती मधिल फ्लॅट धारकांना समान दराने कर आकारणी केल्याने त्यांच्यावर झालेला अन्याय आता दूर झाला आहे. त्यामुळे, सदर प्रकरणी त्वरित मान्यता देण्यात येत आहे. अशाप्रकारच्या दि. ३०/११/२००६ पर्यंतच्या येणाऱ्या प्रकरणावर वरील दराने कर आकारणी येत आहे. ती आपण मुदत वाढवून घेतलेली आहे. पण तरीसुद्धा प्रशासनाने त्यावर काहीही कार्यवाही केलेली नाही. प्रशासनाने असा निर्देश दिला आहे की, आपण एक महिन्यांची मुदत दिली तर आपण मा. महासभेच्या विरुद्ध जाउु शकत नाही. तुम्ही हा विषय मा. महासभेत घ्यायला पाहिजे होता. आपण ठराव करतांना कसा केला होता.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

माननिय सभापतीसाहेबांच्या परवानगीने मी खुलासा करतो, यामध्ये मा. महासभेने धोरण निश्चित केलेले होते. मा. महासभेच्या धोरणाप्रमाणे मा. आयुक्तांच्या मान्यतेने याची अंमलबजावणी झालेली होती. अंमलबजावणीच्या अनुषंगाने झालेले कामकाज माहितीस्तव मा. स्थायी समितीपुढे सादर करण्यात आले होते. त्या अनुषंगाने ही सुधारणा मा. स्थायी समितीनी दिली होती. त्या अनुषंगाने संबंधीत विभागाचे तत्कालीन

मालमत्ता करनिर्धारक व संकलक श्री. अजित पाटील यांच्याकडे प्राप्त संपुर्ण प्रकरण म्हणजे मुदतीच्या बाहेरची प्रकरण आजच्या तारखेपर्यंत ४१ ते ४२ प्रकरण आलेली आहेत. त्याला आणखीन मान्यता देण्यासाठी मा. आयुक्तसाहेबांकडे सादर केलेले आहे. नंतरच्या सभेत ठरल्याप्रमाणे.

**शशिकांत भोईर :-**

मा. महासभेच्या विरुद्ध जाणार नाही. म्हणून आम्ही लोकांना सांगितले नाही. होणार की नाही? आपण मुदतवाढ इकडेसुद्धा दिलेली आहे आणि मा. महासभेमध्ये पण आम्ही सहा महिन्यांचा कालावधी मागितला होता साहेब पण त्यावर तुम्ही १ महिन्यांची मुदत देउुन पेपर नोटीस काढली. त्याच्यानंतर हा विषय जेंव्हा आमच्याकडे निर्लेखित रक्कमा कराव्या लागतील. त्यासंदर्भामध्ये आम्ही सांगितले की, आपण ३०/११/२००६ ची ३ महिन्यांची मुदत वाढवून घ्यायला पाहीजे पण आपल्या प्रशासनाकडून आंम्हाला काही सुचना दिलेल्या नाहीत की आपण महासभेच्या ठरावा विरुद्ध जावू शकत नाही. असे आपण सुचित केले. मग तुम्ही म्हणता आजपर्यंत आलेले आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आजपर्यंत नाही आलेले. त्याच दरम्यान मध्ये मुदतीच्या नंतर ४० प्रकरणे होते. सर्वांचीच अपेक्षा होती की, त्यावर निर्णय व्हावा.

**जेन्वी अल्मेडा :-**

साहेब, मुदतीच्या नंतरचेच आम्ही विचारतो.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्यावर निर्णय व्हावा असे. तो निर्णय घेण्यासाठी मा. आयुक्त साहेबांकडे सादर केलेले आहे.

**जेन्वी अल्मेडा :-**

कारण आम्ही असे उपस्थित केलेले की, उशिरा मुदतीनंतरही आलेले अर्ज स्विकारा म्हणून.

**फॅरो ग्रिटा :-**

त्याच्यानंतर हा ठराव झालेला होता.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, महासभेमध्ये आपण सहा महिन्याची मुदत मागितलेली. असे सर्व नगरसेवकांनी मागणी केलेली पण प्रशासनाने एक महिन्याचीच नोटिस काढली.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

महासभेमध्ये जशी मान्यता दिली होती. त्याप्रमाणेच प्रशासनाने नोटिस काढली.

**शशिकांत भोईर :-**

सहा महिन्यांची मुदत वाढ मागितलेली होती तशी सुचना मांडलेली होती.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही सुचना मांडल्या असाल परंतु, तो ठराव झाला होता.

**शशिकांत भोईर :-**

तरीसुद्धा ती सुचना घ्यायला पाहिजे होती.

**शशिकांत भोईर :-**

आता तुम्ही धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी हा ठराव जसाच्या तसा महासभेपुढे पाठवा. अशी मी प्रशासनाला विनंती करतो. आम्ही मुदतवाढ मागितलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

साहेब, ही सभा जेंव्हा भावना व्यक्त करते. तिथे टेक्निकल अर्थ न घेता तिथे टेक्निकल अडचणी न करता या प्रोसिडींगला विषय आल्याने त्यावर चर्चा करणे स्वाभाविक आहे. आता तुम्ही डॉक्टरांच बोलाल तर, डॉक्टरांच्या ओळखीचे कुणी अमुक आला तर त्याला तुम्ही सपोर्ट करा असा भाग होउ शकत नाही. त्या पिरेडमध्ये जो कोणी ॲप्लीकेंट येईल त्याला आपण सपोर्ट द्यायचा. आपण एका प्रभागातील लोकांना न्याय देत नाही. एका विशिष्ठ समाजाच्या लोकांनाच न्याय देत नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

यामध्ये मागील बऱ्याच वर्षाचा हा प्रश्न होता. सभागृहालाच्या भावना मा. महासभेच्या विचारात घेउन मा. आयुक्तांनी यामध्ये अंमलबजावणी केलेली आहे. आणि आपल्या नंतर आलेली जी प्रकरणे आहेत ती फार तुरळक आहे. असे नाही की फार मोठ्या फार मोठ्या प्रमाणात प्रकरण शिल्लक आहेत. मी असे मान्य करणार नाही का तर मोठ्या प्रमाणावर आपण प्रकरणे अंतिम केलेली आहेत. आणि मा. स्थायी समितीच्या दि. ३०/११/२००६ पर्यंतची जी वाढ आहे. ते करण्यासाठी मा. आयुक्त साहेबांकडे सादर करण्यात आलेला होता. मा. स्थायी समितीच्या निर्णयाप्रमाणे पण मा. महासभेच्या निर्णयाच्या उलट निर्णय करणे अपेक्षित नाही असे मा. आयुक्त साहेबांनी ठरविल्यामुळे त्याची अंमलबजावणी होउ शकली नाही.

**शशिकांत भोईर :-**

तुम्ही जे बोलला त्याच्याशी मी सहमत आहे. पण, त्यावेळी मा. महासभेत सुचना मांडलेली होती की सहा महिन्याची मुदत द्या. आणि प्रशासनाने एक महिन्याच्या मुदतीवर काढले होते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

परंतु, या सभेच्या नंतरच्या मा. स्थायी समितीच्या बैठका झालेल्या आहेत. त्यामध्ये सन्मा. सर्व सदस्यांनी जे अर्ज प्रलंबित आहेत. त्यावर निर्णय घ्यावे असा निर्देश चर्चेच्या माध्यमातून दिलेला होता.

**शशिकांत भोईर :-**

मा. उपायुक्त साहेब, आपलं म्हणणे बरोबर आहे. सदस्यांनी मा. महासभेत सुचना ही केलेल्या की सहा महिन्यांची मुदत द्या. पण तुम्ही प्रशासनाने एक महिन्यांच मुदतीच काढला कार्यकाल प्रशासनाने म्हणजे आमच्या मा. महासभेच्या विरुद्ध प्रशासन गेले असेच झाले.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

असे नाही. मी तुम्हाला याच्यावर विवेचन केलेले आहे. तुमची सुचना असेल. पण सामुहिक मा. महासभेचा जो निर्णय होता. त्याची अंमलबजावणी केलेली आहे. वैयक्तिक मी सुचने बद्दल बोलत नाही हा अंतिम निर्णय झालेला होता.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, त्या मा. महासभेमध्येच निर्णय घेतलेला की सहा महिन्याची मुदत द्यावी. एक महिन्याची मुदत देण्यास सांगितलीच नव्हती. तरीही प्रशासनाने एक महिन्याचीच मुदत दिली.

**रतन पाटील :-**

मा. सभापती साहेबांच्या परवानगीने बोलतो श्री. खतगांवकर साहेब आतापर्यंत अश्या किती रक्कमा निर्लेखित केलेल्या आहेत? अंदाजे त्याचा काही अहवाल देता येईल का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तोच अहवाल दिला होता. ही जी ते चर्चा करता आहेत तोच अहवाल आहे. त्या अहवालाचे इतिवृत्त कायम करण्यावरच ते चर्चा करता आहेत. आपण अहवाल दिला होता. तो अहवाल देखील अंतीम झालेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

आपल्या सभागृहाची भावना अशी आहे की, किती पेंडिग होते ते नाही. कोणी ॲप्लिकेशन केले तेही नाही. जो गरजवंत आहे त्याला न्याय मिळाला पाहिजे. अशी अपेक्षा आहे. त्या पिरेडमध्ये तो बाहेर देखील असला तरी त्याला न्याय मिळाला पाहिजे.

**शशिकांत भोईर :-**

आपण हा विषय मान्यतेसाठी मा. महासभेपुढे मांडला होता. मा. महासभेने सहा महिन्यांची मान्यता दिली होती. मग त्यांनी एका महिन्यांची दिली.

**रोहिदास पाटील :-**

श्री. खतगांवकर साहेब, तेवढी दुरूस्ती करुन घ्याना. त्यात आपल्याला अडचण काय? तेवढी दुरूस्ती करुन घ्या. की जो नियमानुसार ॲप्लिकेशन करेल त्याला तो न्याय मिळेल. मुदतीचे बंधन ठेवू नका. उशिरा आलेले सगळे स्विकारां ना. जी ती थोडीफार असतील. आपली अर्धातास त्यावर चर्चा झाली. दुरुस्ती करुन घ्या. असा मी आग्रह करतो. की जो गरजवंत आहे. जो अर्ज करिल त्याला न्याय मिळू द्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

३१ मार्च पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी.

**रोहिदास पाटील :-**

३१ मार्चपर्यंत जो कोणी बाहेरगावी गेला असेल. असे होणार नाही.

**शशिकांत भोईर :-**

मा. उपायुक्त साहेब, पण याचा ठराव पाहिजे. नाहीतर ती लोक बोलतील त्याचा ठराव नव्हता.

**रोहिदास पाटील :-**

ठरावात दुरूस्ती करणे हा सभापतींचा अधिकार आहे. त्यामुळे सभापती साहेब ठरावात दुरुस्ती करतील.

**फॅरो ग्रिटा :-**

अंतीम तारिख ३१ मार्च असावी असे माझे मत आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण साधारणतः ६०० अर्ज अंतीम केलेले आहेत. आणि त्यामध्ये आपल्याला १७ लक्ष ही निर्लेखित केलेली रक्कम आहे.

**एस. ए. खान :-**

मा. सभापती साहेब, ३१ मार्चपर्यंत मुदत वाढवून द्या.

**रतन पाटील :-**

साहेब, ही एवढी १७ लक्ष रु. तुम्ही जी निरर्लेखित केलेली रक्कम आहे. ती एवढीच आहे की, याच्यापेक्षा जास्त आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

एवढीच आहे. मागच्या सभेत आपण मान्य केलेले आहे. त्याच्यापेक्षा व्यतिरिक्त जास्त नाही ना.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

हो एवढीच रक्कम आहे. अजुन ४२ ते ४५ प्रकरणे मा. आयुक्तांकडे मागच्या सभेत आपण सुचना केल्याप्रमाणे निर्णयासाठी सादर केलेले आहेत.

**रतन पाटील :-**

ती निर्लेखीत झालेली आहेत का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

अजून पर्यंत झालेली नाहीत. झाल्यानंतर आपल्याकडे तो अहवाल येईल.

**रोहिदास पाटील :-**

त्यावर आमची विनंती अशी आहे की, आम्ही तुंम्हाला ते राईट्स देतो. प्रशासनाला राईट्स देतो की ३१ मार्चपर्यंत अशी नियमानुसार निर्लेखित करण्याची जी प्रकरणे येतील त्यांना तुम्ही मुदतीचे बंधन ठेवू नका. चेना ते उत्तनपर्यंतचा जो अर्जदार त्याला लायक आहे किंवा हे निर्लेखित करा. त्याने अर्ज करु द्या. ते अर्ज तुम्ही ३१ मार्चपर्यंत घ्या म्हणजे ॲकेडेमिक इयर आपण घेतलं. मुदत संपली अस उत्तर नको मिळायला. म्हणून त्याच्यावर अन्याय झाला असे नको व्हायला. किंवा पुन्हा कर विभाग आपल्याकडे अहवाल सादर करील. त्याच्यावर पुन्हा आपल्याकडे एक तास चर्चा होईल आणि पुन्हा दोन मत पडतील अशी भानगड नको व्हायला म्हणून आम्ही विनंती करतो.

**एस. ए. खान :-**

मुदत वाढ देण्यात आलेली आहे असे प्रत्येक प्रभाग कार्यालयासमोर बोर्ड लावा.

**रोहिदास पाटील :-**

आताच मी तुम्हाला सांगितले की त्यांनी रु. ८ ते रु. १० लाखापर्यंत अर्ज केला. त्या रेटमध्ये आता नविन अर्ज येणार नाही. रु. १ - २ लाखांची येतील रु. अडीच लाखांचे येतील. जे अर्ज येतील ते येतील. त्यांना माहिती पडेल की तो गरजवंत आहे आणि ज्याच्यावर अन्याय झालेला आहे. तो तुमच्याकडे न्याय मागेल. आम्ही त्या मुदतीलाच तुम्हाला अर्ज देतो. ३१ मार्च पर्यंत नियमानुसार जो तुमच्याकडे अर्ज करिल. त्याला तुम्ही ती सवलत द्यावी. ते प्रकरण आमच्यापर्यंत आणूच नका. अशी मी विनंती करतो. जर टेक्निकल काही अडचण असेल तर सांगा. साहेबांनाही समजावून सांगा सभागृहाची अशी भावना आहे. आणि तुम्हालाही ते सोपे जाईल.

**नगरसचिव :-**

पान क्र. २५ ते ३४ पर्यंत कोणाला दुरूस्ती करायची असेल तर सांगा.

**शशिकांत भोईर :-**

पान नं. २८ मध्ये मी परिवहन बाबत एक सुचना केलेली आहे. जो आपण ठराव केला आहे. जे आपण पार्कींग चार्ज लावणार आहे. ते आपण नमुद केलेले नाही. जेथे बसगाडया पार्किंग होतात. त्यांच्याकडून पार्किंग चार्ज घेण्यात यावा. अशी मी सुचना केलेली होती. त्यांनी जी जागा त्यांच्या ऑफिससाठी वापरली तिच वाढीव घेतलेली आहे. पार्किंगसाठी काय लावलेलेच नाही. तुम्ही ते वाचून बघा आणि माझी तशी सुचना सुद्धा आहे.

**रोहिदास पाटील :-**

त्या बसबाबत काय? किंवा मा. स्थायी समितीमध्ये कधी विषय घ्यायचा किंवा काय? बसमध्ये आपले किती नुकसानीत जातो? आपला जो मा. महासभेत ठराव दिलेला होता. तो ठराव असा होता, की महापालिकेच्या उत्पन्नाची बाजू म्हणून ती परिवहन सेवा सुरु करण्याची आपली धारणा होती. परिवहनची कोणी निवेदन केले तर कळेल.

**शशिकांत भोईर :-**

पान क्र. ३४ वर हा जो ठराव केलेला आहे. मी त्या आधारावर मी सुचना केलेली होती. मा. सभापती साहेब, परिवहनच्या ज्या बसगाडया आहेत. त्यांनी फक्त जागा वापरतात त्यांच भाडे आपल्याला निश्चित करायला पाहिजे. त्यांनी सहानुभुती दाखवीली की तुम्ही हे भाडे आमच्याकडून घ्या. परंतु, जे पार्किंग करतात त्या जागेच्या भाडयासंदर्भात मी सुचना केलेली की त्याच्याकडून पार्किंगच्या जागेचेही भाडे घ्या. कारण त्या ठिकाणी वीस-पंचवीस बसेस आहेत. म्हणून मला हा मुद्दा मांडावा लागला.

**मा. सभापती सो :-**

बस पार्किंग कुठे करतात? कुठल्या जागेत करतात?

**शशिकांत भोईर :-**

आपल्या ब्रिजच्या खाली पार्किंग करतात.

**मा. सभापती सो :-**

त्या बसेस ब्रिजच्याखाली करतात. त्याचेभाडे घ्यावे. असा तुमचा मुद्दा आहे.

**शशिकांत भोईर :-**

पार्किंग विभागाने याची नोंद घेण्यात यावी. आपल्या फाटका जवळ जिथुन पाण्याचे टँकर जातात. त्या साईडला बऱ्याचशा प्रायव्हेट गाड्या उभ्या राहतात त्यांच्याकडूनही पार्किंगचार्ज लावावा. कुणीही रात्री येतो आणि त्याठिकाणी गाडी उभी करुन जातो.

**रतन पाटील :-**

साहेब, एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की भाईंदर (पश्चिम) च्या बाबतीत श्री. शशिकांत भोईर यांनी सांगितले की आपल्या मिरा - भाईंदर महानगरपालिकेच्या बसेस त्याठिकाणी उभ्या राहतात त्याचप्रमाणे काही प्रायव्हेट गाड्या म्हणजे त्या ठिकाणी डम्पर वगैरेसारख्या गाड्या उभ्या राहतात. तसेच भाईंदर पुर्वेला पुलाखाली ट्रान्सपोर्टेशनच्या मोठ्या-मोठ्या गाड्या रात्री पार्किंग केल्या जातात. तुम्ही वस्तुस्थिती पाहून घ्या आणि त्यांच्याकडून आपल्याला कर आकारणी कशी आणि कुठल्यापद्धतीने करता येईल ते बघा. नाहीतर तेवढ्या जागेचा ठेका द्या किंवा महानगर पालिकेचे उत्पन्न वाढवा.

**फॅरो ग्रिटा :-**

त्यामुळे महापालिकेचे उत्पन्न वाढेल.

**मा. सभापती सो :-**

आपल्या मिरा-भाईंदर महापालिकेचे उत्पन्न वाढेल.

**रतन पाटील :-**

कोणताही ट्रान्सपोर्टला येतो आणि गाडी उभी करतो. एक-दोन गाड्या एक दिवस नाही तर १०-१५ गाड्या १०-१५ दिवस उभ्या असतात. ज्या ट्रान्सपोर्टेशनच्या गाड्या असतात त्याच्यात माल भरलेला असतो. उद्या कदाचित त्याच्यात स्फोटक किंवा हानिकारक पदार्थ असतील तर उद्या कुठलाही प्रसंग घडू शकतो. मा. सभापतीसाहेब, तुम्ही संबंधीत गोष्टीबाबत दखल घ्या.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, आपल्या महापालिकेच्या उत्पन्न वाढीचे धोरण आहे.

**नगरसचिव :-**

पान क्र. ३५ ते ४० वर कोणाला काही दुरूस्ती सुचवायची असेल तर सांगा. नाही तर मी दुसऱ्या इतिवृत्तांताचे वाचन करतो.

**रोहिदास पाटील :-**

श्री. हरेश पाटील साहेब, दुसऱ्या प्रोसिडींगमध्ये मी जे बोललो त्या ठिकाणी श्री. जयंत पाटीलांचे नाव लिहिलेले आहे आणि श्री. जयंत पाटील बोललेल्या वाक्यासमोर माझे नाव लिहीलेले आहे. असे उलट सुलट केलेले आहे.

**शशिकांत भोईर :-**

पान क्र. ३ वर माझे वरून संभाषण आहे. त्याच्यामध्ये 'ना' शब्द कट करुन टाका. त्याच्यापुढे वेगळा पडतो असे वाक्य नसुन वेगळा जातो असे वाक्य आहे. पान क्र. ६ वर खालून चौथ्या पॅरेग्राफमध्ये कोणी पण लिहले नसून लिहिले असे पाहिजे. पान क्र. ८ वर नांव शशिकांत पाटील नसुन शशिकांत भोईर असे पाहिजे. त्याच पॅरेग्राफमध्ये दुसऱ्या लाईनवर अशाकाही संस्था आहेत. ज्या स्वखर्चाने उपाययोजना करुन देतात असे पाहिजे. तसेच त्याच पॅरेग्राफमध्ये लोकोपयोगी काय आहे? असे वाक्य आहे. त्या वाक्यातील 'काय' हा शब्द काढून टाका. पान क्र. १४ वर सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील यांच्या वक्तव्यामध्ये एकूण ८७ संगणक असे लिहिलेले आहे. तिथे जे एकूण लिहिलेले आहे. ते डबल आलेले आहे. माझी याठिकाणी एक अशी सुचना आहे की आपली महापालिका होउन आणि संगणक येऊन बराच कालावधी गेलेला आहे. तरीसुद्धा या चुका भरपूर प्रमाणात होत आहेत. या चुका होण्याचे नक्की काय कारण आहे?

**नगरसचिव :-**

आमच्याकडे तीन स्टेनो आहेत आणि संपूर्ण महापालिकेची कामे त्यांना करावी लागतात.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सचिवसाहेब, तुम्ही त्यांना सुचना द्या. ह्याच्यामध्ये काही चांगले करता आले तर बघा.

**शशिकांत भोईर :-**

मी संगणकाबाबत सुचना करतो की तुम्हाला ८७ संगणक देणेबाबत सांगितलेले होते. परंतु, त्याची सुचना ठरावामध्ये आलेले आहे. तुम्ही ठराव झालेला नाही असे बोलले होते. परंतु, मागच्या वेळेला ठराव वाचून दिलेला होता.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याचप्रमाणे सर्व विभागाकडून मागणी केलेली आहे. ती फाईल मा. आयुक्त साहेबांकडे जाईल.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, मी तुम्हाला विनंती करतो की आपण आपल्या सभेचा कुठेतरी मान ठेवायला पाहिजे की नाही.

**मा. सभापती सो :-**

आपण सभेचा मान ठेवलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, मान ठेवतील आणि अधिकारी वर्ग मान ठेवणार नाही तर कसे होईल? आम्ही तुम्हाला सुचना केल्या. त्या सुचना केल्या त्याबाबत तुम्ही असे समजता का? की सन्मा. सदस्य रोहिदास पाटील बोलत असतील तर त्यांना बोलू द्या. सन्मा. सदस्य जयंत पाटील बोलत असतील तर त्यांना बोलू द्या.

सन्मा. सदस्य शशिकांत भोईर बोलत असतील तर त्यांना बोलू द्या. सन्मा. सदस्य रतन पाटील बोलत असतील तर त्यांना बोलू द्या. तुम्ही त्याची पुर्तता करायला पाहिजे. आम्ही तुम्हाला महापालिकेत जे गळयात आयकार्ड असते त्याबाबत मागणी केलेली होती. ती मागणी पुर्ण केली नाही. आम्ही तुम्हाला ठराव करुन दिलेला होता. त्याच्यामध्ये काहीही अडचण नाही. आम्ही तुमच्याकडे एल. सी. डी. मागितला होता तो एल. सी. डी. कुठे आहे? तुमची नक्की काय अडचण आहे?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आमची अडचण काहीही नाही.

**रोहिदास पाटील :-**

हे चांगले काम आहे. याकामाबाबत स्थायी समितीचे सर्व सन्मा. सदस्य तुमच्यावर विश्वास ठेवतात. तुम्हाला मान देतात. मग तुम्ही त्याचे इम्प्लीमेंटेशन करायला पाहिजे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

इम्प्लिमेंटेशन करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सुचना दिलेल्या आहेत. ते काम प्रगतीपथावर आहे. आपली जी ऑफिस प्रोसेस असते म्हणजे टेंडर काढणे निविदा मागविणे वैगरे त्याची कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**रोहिदास पाटील :-**

आपण रु. ९ लाख ९० हजार ९९९चे प्रकरण अवलोकनार्थ पाठवतो. मग तुम्ही एक एल. सी. डी. आणला ती ते काम फक्त रु. दिड लाख ते दोन लाखापर्यंतचे आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आम्ही एल. सी. डी. मागवलेला आहे. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील त्या एल. सी. डी.ची पुर्तता केली जाईल. हा विषय कुठेही डिनाय करण्यासारखा नाही. याच्यामध्ये कोणाचाही अवमान होण्यासारखा नाही.

**शशिकांत भोईर :-**

साहेब, आयकार्डचे काय झाले?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आयकार्डच्या कामाबाबत सर्व मशिनरी सर्व ठिकाणी कार्यान्वित झालेल्या आहेत. आयकार्डचा डेटा फिड झालेला आहे. सर्व आयकार्डचे फोटो काढण्याचे काम झालेले आहे. फक्त लॅमिनेशनचे काम उरलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

परंतू, एल. सी. डी. बाबत काय कार्यवाही केली? ते सांगा. एल. सी. डी.चे काम २४ तासाचे आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

एल. सी. डी. पुढच्या सभेमध्ये येईल.

**रोहिदास पाटील :-**

एल. सी. डी. आणणे काही मोठे काम नाही.

**हंसुकुमार पांडे :-**

मा. सभापतीसाहेब, माझी याठिकाणी अशी एक सुचना आहे की, चौपाटीच्या पाठीमागे जो एक रोड बनतो आहे. त्या रोडचे काम थांबलेले आहे. ते काम लवकरात लवकर पुर्ण करण्यासाठी कॉन्ट्रॅक्टरला सांगा. ते काम पूर्ण होत नाही त्यामुळे त्याठिकाणी सर्व धुळ वैगरे उडते. तो संपूर्ण एरिया खराब करून ठेवलेला आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्याची नोंद घेतली जाईल.

**रोहिदास पाटील :-**

आपल्याला कशाचीही निर्मिती करण्यासाठी थोड्याफार यातना सहन कराव्या लागतात.

**हंसुकुमार पांडे :-**

बरोबर आहे. परंतु, जे काम पास झालेले आहे. त्याची सुरुवात कारायला पाहिजे. साहेब लवकरात लवकर काम झाले पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

जर रोड करायचा असेल तर धुळ उडेल.

**हंसुकुमार पांडे :-**

साहेब, चौपाटीवर एक चबुतरा बाँधा गया है। उस चबुतरे के उपर परमिशन है क्या? कलेक्टर लँड बनाके अभीतक हँड ओव्हर नही हुआ है। हम लोगोने प्याउ और पुलिस चौकी की माँग की है। लेकिन हमारा अभीतक वह निर्णय नही होता है। वह कलेक्टर लॅन्ड है ऐसे बताते है। उसके उपर चबुतरा बाँधने की परमिशन है क्या?

**जयंत पाटील :-**

तिथे बांधकाम करुन कबुतरांना खाणे घालण्यासाठी कबुतरखाना बनवलेला आहे. दादरला एक कबुतरखाना आहे आणि इकडे दुसरा बनवलेला आहे.

**रोहिदास पाटील :-**

मी त्याबाबत मा. सभापतीसाहेबांना माहिती देतो. परंतु, कबुतरांना खाणे घालणे हा एक भावनेचा विषय आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

लोकांना पाणी देणे हासुद्धा भावनेचा विषय आहे.

**रोहिदास पाटील :-**

तो बांधकाम विभागाचा विषय आहे. आम्ही त्या विषयाला विरोध करत नाही. परंतु, कबुतरांना जेव्हा खाणे घालतात ती लो लेव्हल आहे. भरतीचे पाणी वर येते आणि वाहून जाते. आपण ती जी जागा केलेली आहे. ती बुडत होती. मी काल त्या ठिकाणाबाबत मा. सभापतींना सांगून गेलेलो होतो. परंतु, तुमचे कुठलेही बांधकाम नाही. जिथे भरतीचे पाणी वाहून जाते. त्याठिकाणी दोन फुटाची भरणी केली. जेणेकरुन त्या भरतीच्या पाण्याने वाहून जाणार नाही. कबुतरांना दाणे फेकले तर कबुनर येउुन दाणे खाउुन जातील.

**जयंत पाटील :-**

तसा प्रश्न येत नाही. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील जरा वेगळ्या तऱ्हेने बोलत आहेत. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील जे बोलतात आणि जे करतात ते खरे असते. इतर सदस्य जे करतात ते खोट असते. ते कायद्याच्या बाहेरचे असते. त्यांनी ५ फुट उंच चबुतरा बांधला आहे. त्यांनी कबुतरांना दाणे घालण्याबाबत कोणाचीही हरकत नाही. कबुनरांना कुठेही दाणे घालू शकतात.

**हंसुकुमार पांडे :-**

वह काम हम लोगभी कर सकते है।

**जयंत पाटील :-**

कबुनर कुठेही येउुन दाणे खाईल. परंतु, त्याचे जे बांधकाम केलेले आहे. उद्या त्याच्यावर छत टाकले जाईल तुम्ही ते बांधकाम तोडून टाका. तुम्ही ते बांधकाम ठेवू नका. तुम्ही जे सी. आर. झेड. चे नियम सांगता ते नियम लागू होणार नाही.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही बांधकाम तोडून टाका अशी मी भुमिका मांडलेली नाही. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील सांगतात म्हणून बांधकाम तोडायचे असेल तर तुम्ही तशी भुमिका घ्या. तुम्ही बांधकाम करा किंवा करु नका. मी त्याबाबत व्यक्तिगत बोलणार नाही.

**हंसुकुमार पांडे :-**

तुम्ही बांधकाम तोडून टाका असे आमचे म्हणणे नाही.

**जयंत पाटील :-**

पोलिस स्टेशनला परमिशन मिळत नाही.

**हंसुकुमार पांडे :-**

त्याचे तोंड मेन चौपाटीवर आहे. आम्ही पोलिस चौकी आणि प्याउुची मागणी केलेली होती. त्या रोडचे बांधकाम ह्या साईडला आहे. तरीसुद्धा त्याच्यामध्ये ऑब्जेक्शन येते. प्याउुके लिए हजारो लोग आते है। इसलिए हम लोगोने प्याउु की माँग की थी। शौचालय भी होना जरुरी है। मगर प्याउु जरुरी है। पुलिस चौकी जरुरी है। आपने जिल्हाधिकारीको प्याउु के लिये प्रस्ताव भेजा था। मगर आपने चबुतरे के लिए प्रस्ताव नही भेजा। फिर नगरपालिका दुर्लक्ष कर रही है ऐसा है।

**रोहिदास पाटील :-**

किसीनेभी परवानगी नही दी है।

**हंसुकुमार पांडे :-**

नगरपालिकामे बिगर परवानगीसे सब काम चलता है क्या?

**रोहिदास पाटील :-**

चबुतऱ्याला कोणीही परवानगी दिलेली नाही. व्टिस्ट करण्यात फायदा नाही. चबुनरा भावनात्मक म्हणून त्याची भिंत घालून उंची वाढवलेली आहे. त्याच्यामध्ये कोणीही बांधकाम नाही. आपण उगीचच जोरात बोलतो म्हणून बोलायचे.

**हंसुकुमार पांडे :-**

साहेब, आमचा प्रश्न येउुन सात-आठ महिने झालेले आहेत. श्री. दिपक खांबित यांना माहिती आहे. सन्मा. सदस्य रोहिदास पाटील यांना माहिती आहे. आपण प्याउुचा विषय घेतलेला होता.

**रोहिदास पाटील :-**

आम्ही नाही बोलत नाही.

**हंसुकुमार पांडे :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील आप लोगही बोल रहे है।

**रोहिदास पाटील :-**

आप सबजेक्ट व्टिस्ट करके सभा चलाएंगे तो हम लोग आपको कुछ नही बोलेंगे। मी श्री. खतगांवकर आणि मा. सभापतीसाहेबांना सांगू इच्छितो की आम्ही न बोलणारे लोक आहोत. परंतु, आम्ही लिहिणारे आहोत.

**जयंत पाटील :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, तो प्रश्न येत नाही. तुम्ही चुकीचे करत आहात.

**हंसुकुमार पांडे :-**

चौपाटीवर जितनेभी होर्डींग लगाते है। वह सब बी. जे. पी. के रहते है। उसके लिए कोईभी ऑब्जेक्शन नही लेता है।

**रोहिदास पाटील :-**

आप लोग नगरसेवक है। आपको क्यो दुःख होता है?

**हंसुकुमार पांडे :-**

आप नगरसेवक है यह हम लोग मानते है। हम लोग भी नगरसेवक है। हम लोग कुछ नही बोलते है।

**रोहिदास पाटील :-**

नगरसेवक बोर्ड लावतात त्यांचे ह्यांनं दुःख होते. ह्यांना दुःख कशाला होते?

**हंसुकुमार पांडे :-**

चौपाटीवरील सर्व कामे हेच करतात का?

**रोहिदास पाटील :-**

मैं डटके बोलता हूँ। हम लोग नगरसेवक है। हम लोगोंको वाद नही चाहिए। हमलोग जबतक नगरसेवक है तबतक बोर्ड लगेगा। उसमें कोई शक करनेका काम नही।

**हंसुकुमार पांडे :-**

हम लोग जो बोर्ड लगाते है वह प्रशासन निकालके क्यों लेके जाता है?

**रोहिदास पाटील :-**

आप वह प्रशासनसे पुछिये।

**हंसुकुमार पांडे :-**

हमलोग आपको नही पुछ रहे है। हम लोग प्रशासनकोही पुछ रहे है।

**रोहिदास पाटील :-**

श्री. खतगांवकरसाहेब, आम्ही उच्च आवाजाचा परिणाम सांगतो. त्या दिवशीच्या प्रभाग समितीमध्येसुद्धा असाच गोंधळ झालेला होता. प्रभाग समितीच्या मिटींगमध्ये किरण नगरचा नाला आमचा आहे. त्याबद्दल गोंधळ झालेला होता.

**हंसुकुमार पांडे :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, तुम्ही त्या कुठल्याही गोष्टी इथे काढू नका. नंतर मी ओरडतो असे बोलू नका. आप हर प्रभागमें मुह डालते है। आप वह सब जगह मूँह डालना बंद किजिये। आपआपका नं. ६ का प्रभाग देखिये। वह प्रभाग समितीका विषय है। प्रभाग समितीका विषय स्थायी समितीने कैसे आया? हा विषय प्रभाग समितीचा आहे.

**एस. ए. खान :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटीलांकडेच ठेका आहे का? मला हे सांगा. त्यांनी संपुर्ण मिरा भाईंदर शहराचा ठेका घेतलेला का?

**मा. सभापती सो :-**

दोन्ही सदस्यांनी शांत बसावे.

**एस. ए. खान :-**

प्रशासनाने सगळ्यांचेच बोर्ड काढावे असे मला वाटते.

**हंसुकुमार पांडे :-**

प्रशासन भाडे घेते. मग प्रशासनाने भाडेच घ्यावे असे मला वाटते.

**जयंत पाटील :-**

बोर्डाचे भाडे घ्यायला पाहिजे.

**मा. सभापती सो :-**

मी याबाबत श्री. खतगांवकर साहेबांना रुलिंग द्यायला सांगतो.

**एस. ए. खान :-**

श्री. खतगांवकरसाहेब, जर बोर्ड काढायचे असतील तर सगळ्यांचे बोर्ड काढा. कोणाचेही बोर्ड काढण्यामध्ये भेदभाव करु नका.

**रोहिदास पाटील :-**

स्थानिक नगरसेवक आहेत. मग तुम्ही धोरणात्मक निर्णय कसे बोलता?

**एस. ए. खान :-**

जर ह्याच्यापुढे बोर्डाला हात लावला तर आम्ही काय करायचे? ते सांगा.

**हंसुकुमार पांडे :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, तुम्ही स्थानिक आणि वरिष्ठ नगरसेवक आहात. म्हणून आम्ही तुमचा सन्मान करतो.

**रोहिदास पाटील :-**

तुमच्यामध्ये थोडा बदल झाला तर आम्हाला आनंद वाटेल.

**हंसुकुमार पांडे :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील साहेब, आज वह किरन नगरके नाले का विषय यहाँ पर लाऐंगे तो नही चलेगा।

**मा. सभापती सो :-**

आप दोनो शांत रहिए।

**रोहिदास पाटील :-**

मैं सब कुछ बरदाश्त कर सकता हूँ। मगर तुम लिमिट छोडकर जोरसे बोलने का प्रयास करेंगे तो कैसे होगा? मी त्यादिवशी बाईंनासुध्दा सांगितले सन्मा. सदस्य एस. ए. खान साहब उसदिन आपने मुझसे झगडा किया तो मै इनको बोला था। आपको इसके बारेमें जानकारी है। वह मंदिर तीन दिन के बाद नही किया है। मैने यह बात उस बाई को भी बताई थी। आपका जो नया काम है वह नया है। जानकारी नही है तो नही बोलना अक्ष्छा रहता है। जो विषय है उसके उपर चर्चा होनी चाहिए।

**हंसुकुमार पांडे :-**

साहेब, आमचासुध्दा विषय पास करुन घ्या. आमचा प्याउु आणि पोलिस चौकीचा विषय पास करुन घ्या.

**एस. ए. खान :-**

यह विषय छः महिने या एक साल पुराना है।

**रोहिदास पाटील :-**

उसके डिटेलमेभी १०० लोगोने साईन करके दिया था।

**एस. ए. खान :-**

१०० क्या २०० लोगोने साईन करके दिया है।

**रोहिदास पाटील :-**

यह मॅटर पावणे तीन साल से है। उसके लिए कितना मंजूरी दिया है। और किसका मंदिर है यह आज मैं मा. आयुक्त साहबसे पुछूंगा।

**जयंत पाटील :-**

मा. सभापती साहेब, शेवटी त्या कबुतर चौथ-याचे काय करायचे? तुम्ही त्याबाबत निर्णय द्या.

**मा. सभापती सो :-**

मी याबाबत सदस्यांना सुचना केलेली आहे.

**जयंत पाटील :-**

जो निर्णय सगळ्यांना आहे. त्याबाबतीत आपण सी. आर. झेड. जे म्हणतो किंवा स्थानिक नगरसेवक हा विषय होत नाही. माझ्या प्रभागामध्ये चौपाटी आहे. म्हणजे ती माझी चौपाटी आहे. असा त्याचा अर्थ होत नाही. मग श्री. रोहीदास पाटील हे दुस-याच्या वॉर्ड मध्ये जावू शकणार नाही. श्री. रोहीदास पाटील अशाप्रकारचे बोलतील तर तेव्हा ते दुस-या नगरसेवकाच्या वॉर्ड मध्ये जाउु शकणार नाहीत.

**मा. सभापती सो :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील, जे नगरपालिकेच्या कायद्यामध्ये बसत असेल त्याच्याचर मा. आयुक्तसाहेब अंमलबजावणी करतील.

**रोहिदास पाटील :-**

माझ्या प्रभागामध्ये मा. आयुक्तसाहेब किंवा कोणत्याही सदस्याने यावे. मी त्याचा सन्मान करित आणि मी त्यासाठी बोलत नाही.

**जयंत पाटील :-**

तुम्ही आता बोलतात की मी जोपर्यंत नगरसेवक आहे. तोपर्यंत तिथे होर्डींग लागेल. आम्ही चौपाटीवर होर्डीग लावू शकतो.

**रोहिदास पाटील :-**

मी स्थानिक नगरसेवक आहे आणि मी त्यांचे स्वागत करतो एवढेच माझे म्हणणे आहे.

**जयंत पाटील :-**

आपण होर्डिंगचे पाच वर्षे भाडे घेत आहोत.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

होर्डिंगबाबत चर्चा करण्याबाबत मी असे सांगू इच्छितो की श्री. संभाजी पानपट्टे, मा. उप-आयुक्त हे जिल्हाधिका-यांच्या बैठकीत आहे. मी होर्डिंग संबंधात संबंधित विभागाला सुचना देतो. ज्या होर्डिंग लागतील या होर्डिंग अर्जाप्रमाणे लागतील आणि मुदत संपल्यानंतर सर्वांचे होर्डिंग काढून टाकले जातिल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, मागच्या वेळेला चोपाटी आणि काशिमिरा नाक्या वरिल होर्डिंग काढावेत असे ठरलेले होते. त्याचे इम्प्लिमेंटेशन केले का?

**हंसुकुमार पांडे :-**

साहेब, ते होर्डिंग परमनंट आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

या सभागृहाच्या भावना संबंधित विभागाला कळवून त्याची अंमलबजावणी केली जाईल. तसेच, आपण पालिस चौकी, पाण्याची टाकी आणि शौचालयाचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर केलेला आहे. त्या प्रस्तावाला अद्यापपर्यंत परवानगी मिळालेली नाही.

**हंसुकुमार पांडे :-**

त्याची परवानगी जिल्हाधिका-यांकडे पाठवा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

जर सर्वांना कबूतरखान्याचा आक्षेप असेल तर आपल्या ज्याकाही सुचना असतील त्याच्यावर कार्यवाही केली जाईल. ते मी त्या बांधकामाची पाहणी केलेली नाही. ते बांधकाम आक्षेपाधीन आहे का?

**जयंत पाटील :-**

याठिकाणी बांधकामाच्या आक्षेपाचा प्रश्न येत नाही. आम्ही आक्षेप घेतल्यानंतरच तुम्ही कार्यवाही करणार आहात का?

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तसे नाही. सर्वांना कार्यवाहीचा नियम सारखाच राहिल.

**जयंत पाटील :-**

तुम्ही आम्हाला जो सी. आर. झेड.चा नियम दाखवता. तो नियम सर्वांना लागू होईल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

श्री. अजित पाटील, तुम्ही पाहणी करुन घ्या.

**एस. ए. खान :-**

जर तुम्हाला मंदिर ठेवायचे असेल तर ठेवा आमचे त्याला काहिहि ऑब्जेक्शन नाही.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य एस.ए. खान यांना ऑब्जेक्शन घेण्याचे काहीही कारण नाही, सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनासुद्धा ऑब्जेक्शन असण्याचे कारण नाही आणि सन्मा. सदस्य हंसुकुमार पांडे को भी नही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

त्यांची भावना अशी होती की आमचे प्रस्ताव जिल्हाधिका-यांकडे जातात. काही प्रस्ताव इथून फायनल करतात. आपण याठिकाणी एक आहोत.

**रोहिदास पाटील :-**

महासभेच्या अधिका-यांना ते करायला सांगायला मी हा विषय रेकॉर्डवर आणलेला आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही नक्की काय ते ठरवा.

**जयंत पाटील :-**

ज्यांनी पोलिस स्टेशनची मागणी केलेली आहे. त्यांना पालिस स्टेशनचे बांधकाम करायला द्या. ज्यांनी प्याउची मागणी केलेली आहे. त्यांना प्याउचे बांधकाम करु द्या. असे तुम्ही ठरवा.

**मा. सभापती सो :-**

ज्यांनी चबुत-याची मागणी केलेली आहे. त्यांना चबुतरा बांधू द्या.

**जयंत पाटील :-**

तुम्ही यागोष्टीला मान्यता देणार ना.

**शशिकांत भोईर :-**

तुम्ही या सगळ्याला मान्यता द्या.

**रोहिदास पाटील :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील, मी तुम्हाला विनंती करतो की मी त्या दिवशी प्याउ संबंधी बोललो होतो. तुम्ही मागच्या वेळेची प्रोसिडींग वाचून बघा माझी सद्सद्विवेकबुद्धी मला नक्की सांगतो. मी तुम्हाला विरोध केलेला नव्हता. आपला प्याउ झाला पाहिजे. पोलिस चौकी झाली पाहिजे, शौचालय झाले पाहिजे. सी. आर. झेड.मध्ये सरकार बांधकाम करुन देत नाही. सी. आर. झेड.मध्ये कळत नकळत भावनात्मक चुका झाल्या

आणि त्या अधिकाऱ्यांवर केस झालेली आहे. त्याच्यामध्ये अधिकारी 'होय' म्हणत नाहीत ही स्थिती आहे. परंतु, आम्ही प्याउु बांधु नका असे बोललो नव्हतो. मी सुद्धा तसे बोललो नव्हतो.

**हंसुकुमार पांडे :-**

अपना जो इलेक्ट्रिसिटीका केबिन है। उधर बिल्डींग बनी है। सब बना है। उधर सी. आर. झेड. का सवाल नही आता है।

**रोहिदास पाटील :-**

आप कुछभी बनाओ मैं 'ना' नही बोलता हूँ। मगर आप विषय व्टिस्ट कर रहे है। आप किसीको अपमानीत करता ऐसे मत करो।

**हंसुकुमार पांडे :-**

आप विषय व्टिस्ट कर रहे है।

**जयंत पाटील :-**

मी विरोधात नाही.

**मा. सभापती सो :-**

तुमचा विरोध नाही.

**जयंत पाटील :-**

श्री. खतगांवकरसाहेब, ह्या गोष्टीची मान्यता स्थायी समितीला घ्या. त्यांनी चबुतरा करायला पाहिजे तर करु द्या.

**रोहिदास पाटील :-**

मग हा विषय याठिकाणी कशाला आणता?

**मा. सभापती सो :-**

सन्मा. सदस्य जयंत पाटील त्यांचा विरोध नाही असे सांगतात.

**हंसुकुमार पांडे :-**

आमचा विरोध नाही. परंतु, तुम्ही आम्हाला प्याउु, शौचालय, पोलिस चौकी बांधून द्या.

**जयंत पाटील :-**

आम्ही उद्या बांधकाम सुरु करतो.

**रोहिदास पाटील :-**

मी विरोध का करतो?

**मा. सभापती सो :-**

तुम्ही बांधकामाला सुरूवात करा.

(सन्मा. सदस्या श्रीम. ज्युडी डिसोझा यांनी प्रकरण क्र. १४४ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**गिता जैन :-**

या ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती सो :-**

सदर ठराव मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १४४ :-**

दि. १७/०८/२००६ व दि. २५/०८/२००६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १४८ :-**

दि. १७/०८/२००६ व दि. २५/०८/२००६ रोजीच्या मा. स्थायी समिती सभेच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्यांनी सुचविलेल्या दुरुस्तीसह व सुचनांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्रीम. ज्युडी डिसोझा** **अनुमोदकः- श्रीम. गिता जैन**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १४५ चे वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

आम्हाला या विषयावर चर्चा करायची आहे.

**मा. सभापती सो :-**

या विषयावर नंतर चर्चा करा.

**रोहिदास पाटील :-**

काही विषय आले पाहिजेत आणि त्याच्यावर चर्चा झाली पाहीजे. आपल्याला याठिकाणी चर्चा करायची असते.

**शशिकांत भोईर :-**

मा. सभापतीसाहेब, माझी याठिकाणी अशी सुचना आहे की, ह्याच्यामध्ये वृक्षप्राधिकरणाचा विषय आहे का? आपण सुभाषचंद्र बोस मैदानाच्या माती भरावाचे टेंडर दिलेले होते. मी त्याबाबत अशी सुचना केलेली होती की ४०० मिटरचा धावण्याचा ट्रॅक घेतला पाहिजे. परंतु, माती भरावासाठी जो लाल कलर लावतात. तसा कलर ठेवलेला आहे. मैदानामध्ये मोठे-मोठे खड्डे आहेत. ते कधी भरणार?

**मा. सभापती सो :-**

तुम्ही किती दिवसापुर्वीचे बोलता?

**शशिकांत भोईर :-**

मी दोन दिवसापुर्वीचे बोलतो.

**मा. सभापती सो :-**

मी काल गेलेलो, काम रितसर चालले आहे. तिथे सर्व भरणी करायला मी सांगितले आहे.

**शशिकांत भोईर :-**

कारण त्या मैदानामध्ये खड्डे खड्डे भरपुर आहे.

**मा. सभापती सो :-**

मी प्रत्यक्ष स्वतः पाहणी केली आहे की, त्याची लेव्हल झाली आहे.

**रोहिदास पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, मी याठिकाणी २ महत्त्वाचे विषय मांडू इच्छितो मी प्रथम नाल्याचा विषय मांडू इच्छितो.

**मा. सभापती सो :-**

नाल्यांचे विषय नंतर घ्या.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सभापतीसाहेब, ह्याच्यामध्ये ॲडीशन करा की, हॉस्पिटल जे बांधणार आहे. त्या हॉस्पिटलमध्ये ज्यांनी फंड दिला आहे. आता उदा. मा. श्री. गणेश नाईक साहेबांनी फंड दिला आहे. तर त्याच्यामध्ये त्यांच नाव टाका. महापालिकेने फंड दिला तर महापालिकेचे नाव टाका. कारण तिथे जो बोर्ड आहे. तो फक्त एका सदस्यांच्या नावावर आहे. तर ज्यांनी - ज्यांनी आमदार निधी दिलेला आहे. आणि महापालिकेने जो फंड दिलेला आहे. तसं त्या बोर्डवर नमुद करा. सुचना फलक लावा आणि आता ही जी आपण निविदा मंजुरी दिलेली आहे. ह्याचे जे काम होणार आहे त्याचे रितसर उद्घाटन करा. त्या उद्घाटनाला सगळ्यांना बोलवा.

**एस. ए. खान :-**

आपण उद्घाटन करुया.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

या ठरावामध्ये ॲडीशन करुन घ्या.

**रोहिदास पाटील :-**

आपण सगळोण उद्घाटनाला जाउुया.

**रतन पाटील :-**

माझी या ठिकाणी एक सुचना नमुद करा. महापालिकेला १३ तारखेला मसुरी येथे दौरा जाणार आहे. १३ तारखेपुर्वी उद्घाटन होत असेल तर बघा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण १३ तारखेपुर्वी उद्घाटन करु शकत नाही.

**जयंत पाटील :-**

परंतु, उद्घाटन कधी होणार? ते सांगा.

**जेन्वी अल्मेडा :-**

माझी याठिकाणी एक अशी सुचना आहे की, ह्या उद्घाटनंच्या फलकावर प्रथम नगराध्यक्ष गिल्बर्ट मेंन्डोसा यांचे नाव लिहिले जावे. तुम्ही ही सुचना ह्याच्यामध्ये घ्यावी.

**रतन पाटील :-**

त्याफलकावर स्थायी समितीच्या सदस्यांची नावे आली पाहिजेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

स्थायी समितीच्या सदस्यांची नावे आली पाहिजेत.

**जयंत पाटील :-**

शासनाच्या नियमानुसार जी नावे द्यायची असतील ती नावे द्या.

**शशिकांत भोईर :-**

शासनाच्या नियमानुसार नावे घ्या.

**जयंत पाटील :-**

तुम्ही एक चांगले काम करा. मिरा भाईंदरमध्ये एका चांगल्या कामाला सुरुवात होत आहे. आपल्याला ब्लड बँकेचीसुद्धा आवश्यकता आहे. इतर गोष्टींचीदेखील आवश्यकता आहे. आपल्या प्रभाग समितीचे कार्यालय त्याठिकाणी होत आहे. तेव्हा ह्या गोष्टीला कोणीही जास्त ताणून धरू नये. नावांत जो काही बदल करायचा असेल ते नंतर बघुया.

**फॅरो ग्रिटा :-**

आपण नंतर न बघता आताच बघुया.

**जेन्वी अल्मेडा :-**

आपण नंतर नको बघुया.

**मा. सभापती सो :-**

आपल्याला नंतर ठरवता येईल.

**जेन्वी अल्मेडा :-**

आपण ह्याच्यामध्ये जे ठरवलेले आहे, ती नावे दिलेली आहेत किंवा जे सुचवलेले आहे. मी त्याबाबत सांगितलेले आहे.

**मा. सभापती सो :-**

तुमच्या बाकीच्या ज्याकाही अटी शर्ती असतील तुम्ही त्या पुर्ण होउ द्या का असाच ठराव पास करायचा का? त्यांची नावे यायला पाहिजेत की नको. तुम्ही फक्त ठराव पास करा असे बोलता.

**हंसुकुमार पांडे :-**

शासनके हिसाबसे जैसे होगा वैसे किजिए।

**मा. सभापती सो :-**

तुम्हाला कुठली नावे पाहिजेत ते सांगा.

**ज्युडी डिसोजा :-**

स्थायी समितीच्या सर्व नगरसेवकांची नावे आली पाहिजेत. शिवाय ह्याच्यामध्ये प्रथम नगराध्यक्ष मा. श्री. गिल्बर्ट मेंन्डोसा यांचेसुद्धा नाव लिहिण्यात यावे.

**मा. सभापती सो :-**

भुमिपुजन करायचे की उद्‌घाटन करायचे ते सांगा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

आपण आता जी निविदा मंजुर केली तिच आहे.

**दिपक खांबित :-**

आपण जे दोन मजले बांधणार आहोत त्याचे भुमिपुजन करायचे आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

भुमिपुजन कसे होणार? भुमिपुजन तर झालेले आहे.

**मा. सभापती सो :-**

आपल्याला दोन मजल्याचे भुमिपुजन करायचे आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

नविन कामाची सुरूवात करण्यासाठी उद्‌घाटन करायचे आहे.

**हंसुकुमार पांडे :-**

बार-बार भुमिपुजन करना ऐसे नही होता है। भुमिपुजन एक बार हुआ है। भुमिपुजन कम्प्लिट होगा तब ओपनिंग की पुजा करो। उपर जो दो मजले तैयार हुए है उसका भुमिपुजन करनेका है। निचेवाला जुना है। वह नये भुमिपुजनकी बात कर रहे है। वह नये भुमिपुजनकी बात कर रहे है। मेरी यहाँपर सुचना है की जो भी कायदेसे होगा वह किजिए।

**रतन पाटील :-**

माझी याठिकाणी एक अशी सुचना आहे की ही इमारत तयार होईपर्यंत मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन्मा. सदस्यांची मुदत संपणार आहे. त्याच्यावर एक पाटी लावायची आहे. ती पाटी कशी लावणार आहात? ह्या स्थायी समितीच्या ज्या सदस्यांनी हा ठराव महासभेमध्ये पास केलेला आहे किंवा स्थायी समितीमध्ये पास केलेला आहे किंवा स्थायी समितीमध्ये पास कलेला आहे. त्यांची नावे यायला पाहिजेत.

**मा. सभापती सो :-**

त्यांची नावे यायला पाहिजेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

असे नाही. आपण ठरावात नमुद करु म्हणजे ते अटीशर्तीमध्ये येईल.

**मा. सभापती सो :-**

सदर ठराव सर्वानुमते मंजुर आहे.

**प्रकरण क्र. १४५ :-**

निविदांना मंजुरी देणे. (सार्व. बांधकाम विभाग)

**ठराव क्र. १४९ :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीत मिरारोड येथे विकास आराखडयातील आरक्षण क्र. १९२,१९३ मधील नियोजित रक्तपेढी, वातानुकुलित शवागृह, दवाखाना व वाचनालय इमारतीवर दवाखाना व प्रभाग कार्यालयाकरीता वाढीव दोन मजले बांधणे कामी मा. महासभा दि. १८/०५/२००६ ठराव क्र. २० अन्वये प्रशासकिय / आर्थिक मान्यता प्राप्त आहे. सदर कामी रू. २,०४,७७,८५२ /- एवढया रकमेच्या अंदाजपत्रकिय रकमेची निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर कामी प्रथम निविदा सुचनेनुसार अंदाजपत्रकिय दरापेक्षा ५४ % जास्त दराची निविदा आल्याने फेर निविदा मागविण्यात आली. तद्नंतर दुस-या वेळेस सुध्दा दर वाटाघाटीनंतर अंदाजपत्रकिय दरापेक्षा ५२.१० % जास्त दराची निविदा आल्याने पुन्हा तिस-यांदा फेर निविदा माविण्यात आली. सदर निविदाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

१) मे. पारस कंन्स्ट्रक्शन (दर वाटाघाटीनंतर) ५० % जास्त दराने
२) मे. साईदत्त एन्टरप्रायजेस ८३.०० % जास्त दराने.
३) मे. श्रीजी कंन्स्ट्रक्शन ७८.०० % जास्त दराने

मे. पारस कंस्ट्रक्शन यांची दरवाटाघाटी नंतर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५० % जास्त निवीदा आहे. मा.स्थायी समिती सभा दि. १/११/२००६ प्रकरण क्र. १२७ अन्वये प्रकरणावर मा. सभापती स्थायी समिती यांनी सन २००६-०७ च्या वर्षाची नवीन जिल्हा दरसुची उपलब्ध झाल्याने सदर निविदा मधील दराची तुलना सन २००६-०७ या वर्षाच्या जिल्हा दरसुचीतील दराशी करण्याबाबत निर्देश दिल्यानुसार तुलना करण्यात आली

सन २००५-०६ या वर्षातील जिल्हा दरसुचीतील दरानुसार एकुण रू. २,०४,७७,८५२/- रकमेचे अंदाजपत्रक आहे. तर सन २००६-०७ या वर्षाच्या जिल्हादरसुचीतील दरानुसार रू. २,२५,९५,७७९/- रक्कमेचे अंदाजपत्रक होत आहे. ठेकेदार मे. पारस कंस्ट्रक्शन यांनी सन २००५-०६ या जिल्हा दरसुचीतील दरावर निविदा सादर केलेली आहे. मे. पारस कंस्ट्रक्शन यांनी दरवाटाघाटीनंतर सादर केलेल्या अंदाजपत्रकातील दरापेक्षा ५० % जास्त दराच्या निविदेनुसार अपेक्षित खर्च रु. ३,०७,१६,७७७/- एवढा होणार आहे . म्हणजेच सदर निविदा हि सन २००६-०७ या नविन व चालू जिल्हासुचीतील दरापेक्षा ३५.९४ % जास्त दराची होत आहे. सदर काम हे इमारतीचे असुन जिल्हा दरसुचीतील दरापेक्षाही भाव वाढलेले आहेत. तरी मे. पारस कंन्स्ट्रक्शन कंपनी यांच्या अंदाजपत्रकातील दरापेक्षा ५०.०० % दराच्या निविदेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मंजुरी देण्यात येत आहे. सदर कामी ठेकेदारांची वेळोवेळी येणा-या देयकांच्या प्रदानास ही सभा मंजुरी देत आहे. सदर ठरावाच्या इतिवृत्तांत मंजुरीची वाट न पाहता तातडीने अमंलबजावणी करण्यात यावी.

**सुचक :- श्री. एस. ए. खान.** **अनुमोदकः- श्री. हंसुकुमार पांडे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांनी प्रकरण क्र. १४६ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**शशिकांत भोईर :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती सो :-**

सदर ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १४६ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील १९ महसुली गावांचे नगर भूमापन करणेबाबत निविदेस मंजुरी देणे.

**ठराव क्र. १५० :-**

शासनाने २००० साली महाराष्ट्र जमीन महसूल (गाव, शहर व नगर भूमापन) नियम १९६९ मध्ये सुधारणा करुन नगर भूमापनाचे काम खाजगी संस्थेमार्फत शासनाच्या पुर्व मंजूरीने करुन घेता येण्याचे धोरण ठरविलेले आहे.

शासनाच्या वरिल धोरणाचे अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेने महानगरपालिका क्षेत्राचे नगर - भूमापन खाजगी संस्थेमार्फत करुन घेण्यासाठीचा धोरणात्मक प्रस्ताव शासनाचे पुर्वमंजूरीसाठी सादर करण्यासाठी व तद्अनुषंगिक आर्थिक प्रशासकीय मंजूरी मा. महासभेने ठराव क्र. २७ अ, दि. १८/०९/०३ अन्वये दिलेली आहे.

वरिल प्रमाणे शासनाकडे प्रस्ताव सादर केला असता शासनाकडून शासन निर्णय क्र. न.भू.मा./१००५/१६०५/प्र.क्र.११/ल-१, दि. ३०/०१/०६ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्राचे नगर - भूमापन खाजगी संस्थेमार्फत करुन घेण्याकरिता मंजूरी मिळालेली आहे.

मा. जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य) पुणे यांनी दि. १४/०२/०६ रोजी घेतलेल्या बैठकीतील निर्णयानुसार खाजगी संस्थेची निवड करण्यासाठी जाहिर निविदा देणे, खाजगी संस्थेची निवड करणे, कामाचे आदेश देणे व कामावर नियंत्रण ठेवणे यासाठी चार सदस्यिय समिती नियुक्त केलेली आहे.

समिती सदस्य खालील प्रमाणे –

१) आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका, भाईंदर
२) उपसंचालक भूमि अभिलेख, संलग्न जमाबंदी आयुक्त (सर्वसाधारण) पुणे
३) उपसंचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई
४) अधिक्षक, भूमि अभिलेख, ठाणे

वरिल प्रमाणे गठीत समितीचे मान्यतेने खाजगी संस्थेची निवड करण्यासाठी दि. १६/०९/०६ रोजी दैनिक ''नवशक्ती'' व दैनिक ''फ्री प्रेस जर्नल'' या वृत्तपत्रामधून निविदा सूचना प्रसिध्द करण्यात आली असता खालील प्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| **अ.क्र.** | **संस्थेचे नाव** | **दरपत्रकानुसार (Schedule – ए) कामाचा एकूण देकार** |
|---|---|---|
| १ | मे. मोनार्च सर्व्हेअर ॲन्ड कॉन्ट्रक्टर्स प्रा.लि. | रु.१,४४,२३,२२०.००/- |
| २ | मे. राणे मॅनेजमेंट प्रा.लि. | **रु.१,४२,५८,२६०.००/-** |
| ३ | मे. पी.एन. शिदोरे ॲन्ड कंपनी | रु.१,४३,६६,७६०.००/- |

वरील तुलनात्मक तक्ता पहाता मे. राणे मॅनेजमेंट प्रा.लि. यांचा देकार सर्वात कमी दराचा प्राप्त झालेला आहे. त्यानुसार खाजगी संस्थेची अंतिम निवड करण्यासाठी दि. ०८/११/०६ रोजी उपरोक्त गठीत समितीची बैठक आयोजित करण्यात आली असता सदर कामाची व्याप्ति व निकड लक्षात घेता वरिल प्राप्त तीन निविदाधारकाना कार्य भागशः विभागुन देण्याचा निर्णय घेण्यात आला व उपरोक्त प्राप्त सर्वात कमी दर (रु.१,४२,५८,२६०.००/-) हे निविदा दरापेक्षा ८% ते १०% जास्त असल्याने निविदा दरात (रु.१ कोटी ३२ लक्ष) काम करण्याबाबत मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी संस्थेशी वाटाघाटी करुन निर्णय घेण्याचे ठरले. त्याप्रमाणे आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी दि. १४/११/०६ रोजी संस्थेशी निविदा दरात म्हणजेच रु.१ कोटी ३२ लक्ष किंमती मध्येच काम करण्याचे अनुषंगाने चर्चा करुन संस्थेस प्राकलन दरात काम करण्यास राजी केलेले आहे व तसे संस्थेने मान्य करुन दि. २१/११/०६ रोजी स्विकृती पत्र दिलेले आहे व कार्यादेश मिळण्यास विनंती केलेली आहे.

वरिल प्रमाणे प्राप्त तीन संस्थेच्या निविदा स्विकारणेस व तद्अनुषंगिक पुढील कार्यवाही करणेस तसेच ठरावाच्या इतिवृत्ताची मंजूरीची वाट न पहाता अंमलबजावणी करणेस ही स्थायी सिमिती मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील.** **अनुमोदक:- श्री. शशिकांत भोईर.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र. १४७ चे वाचन केले.)

**रतन पाटील :-**

मा. सभापतीसाहेब, प्रकरण क्र. १४७ काशिमिरा स्मशानभूमीत लाकडे ठेवण्यासंबंधी हा जो विषय होता त्याबाबत थोडीशी चर्चा करायची आहे. की जसे भाईंदर (पूर्व) विभागामध्ये परीहीत सेवा संघ, भाईंदर (पश्चिम) येथे चैतन्य संघ आहे. शिवाय मिरा रोडच्या ज्या तक्रारी आहेत. आपण त्याबाबत मिरा रोडला ज्याठिकाणी लाकडे ठेवायला दिलेली आहे. त्याठिकाणी कधी-कधी दोन-तीन दिवस प्रेत थांबवावे लागते. कारण ज्या व्यक्तीकडे त्याची चावी असते ती व्यक्ती कधी भेटत नाही अशा पद्धतीने नागरिकांची गैरसोय होवु नये किंवा त्याठिकाणी ते प्रेत ताटकळत राहू नये अशा पद्धतीने आपण ज्याच्याशी ॲग्रीमेंट करणार आहोत त्याला अशा सक्त सुचना द्या. आपल्याकडे इतर गरिब व जो आदिवासी विभाग आहे. त्या आदिवासी

विभागाची परिस्थिती दारिद्र्यरेषेखाली आहे. अशा लोकांना एखाद्या नगरसेवकाचे पत्र आल्यानंतर किंवा ज्यांना कोणी नाही अशांना लाकडे सुविधा देणे आवश्यक आहे.

**मा. सभापती सो :-**

आपण स्मशानाच्या दहनाच्या वस्तू सर्व नागरिकांना मोफत देउ शकत नाही.

**रतन पाटील :-**

परंतु, आपण गरिबांना अशी सुचना द्यावी असे माझे म्हणणे आहे.

**मा. सभापती सो :-**

गरिब वैगरे सगळी लोक नगरसेवकांचे पत्र घेतात.

**जयंत पाटील :-**

तो त्यांचा निर्णय आहे.

**मा. सभापती सो :-**

तसे होउ शकत नाही.

**रतन पाटील :-**

सेवा संघामध्ये असे केले जाते. साहेब, आपण सगळ्यांसाठी अस करुया. आता तुम्ही पत्र दिले की अशी - अशी व्यक्ती मरण पावलेली आहे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही तुमच्या भावना मांडा. तुम्ही आग्रह करु नका. तुम्ही तुमचे मत मांडा.

**फॅरो ग्रिटा :-**

जर ती मृत पावलेली व्यक्ती माझी आपुलकीची असेल तर मी काहीही सांगू शकत नाही.

**रतन पाटील :-**

जर आपण ते सर्व सामान ठेवायला आणि जागा निश्चित करायला करतो तर आपल्याला नक्कीच निर्णय घ्यावा लागेल.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

शासनस्तरावर हे काम १०० टक्के फ्रि दिले जात नाही. प्रत्येक बाबीला काही ना काही मुल्य देणे अपेक्षित आहे. लोकांना त्याची सवय लावायला पाहिजे.

**मा. सभापती सो :-**

परंतु, आपल्याकडे तसे होते.

**रतन पाटील :-**

तुम्ही कमी दर घ्या.

**रतन पाटील :-**

मी सन्मा. सदस्यांनी केलेल्या सुचनेशी सहमत आहे. मी त्या पद्धतीने करतो. म्हणून मी सुचना करतो की आपण निर्णय दिला ती बरे होईल. मग तुम्ही नाकारणार आहात का? काशिमिऱ्याचे नगरसेवक आहेत. आपण हा मृत व्यक्ती आदिवासी किंवा अन्य कोणीही व्यक्ती असेल की ज्याला कोणीही वारस नसेल तर आपण त्याला सहकार्य करावे.

**मा. सभापती सो :-**

ती नगरपालिकेची जबाबदारी आहे. नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना जे काही करायचे असेल ते करतील.

**रतन पाटील :-**

मी याठिकाणी सुचना मांडतो.

**एस. ए. खान :-**

मा. सभापतीसाहेब, सन्मा. सदस्य रतन पाटील यांनी मिरारोडला लाकडांचा प्रॉब्लेम होतो. असे सांगितले आहे. चार-चार माणसांकडे पावती फाडायचे काम आहे. परंतु, आमच्याकडे अजुनपर्यंत कशी तक्रार आलेली नाही. मी तिकडील स्थानिक नगरसेवक आहे म्हणून मला माहित आहे.

**रतन पाटील :-**

सन्मा. सदस्य एस. ए. खानसाहेब माझ्याकडे तक्रारी आलेल्या आहेत.

**एस. ए. खान :-**

२४ तास काही ठिकाणी स्मशानात रहायला जागा नाही.

(सन्मा. सदस्य श्री. रविंद्र माळी यांनी प्रकरण क्र. १४७ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**एस. ए. खान :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, नवघर स्मशानभुमीबद्दल काय झाले? ते सांगा. त्याचे काम कुठपर्यंत आले.

**जयंत पाटील :-**

आम्हाला आमच्या प्रभागातील काम पूर्ण झाले पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

तुमचे अध्यक्ष मध्येच हस्तक्षेप करतात हे योग्य नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सन्मा. सदस्य रोहिदास पाटील, तुम्ही ज्येष्ठ सदस्य आहात. त्यामुळे तुम्ही वैयक्तिक बोलू नका.

**शशिकांत भोईर :-**

मे. साईनाथ को-ऑप सोसायटी ही लाकडे वगैरे अंत्यविधीसाठी लागणाऱ्या सामानाचा पुरवठा करणार आहे. ती 'ना नफा ना तोटा' तत्वावर लाकडांचा पुरवठा करणार आहे की धंदा म्हणून लाकडांचा पुरवठा करणार आहेत ते सांगा.

**मा. सभापती सो :-**

धंदा म्हणून लाकडांचा पुरवठा करत नाहीत.

**शशिकांत भोईर :-**

आम्हाला ठराव क्र. ७१ बाबत काहीही माहिती नव्हते म्हणून मी विचारले तुम्ही ठराव क्र. ७१ चे वाचन केले तर बरे होईल. दि. २७/१२/२००२ रोजी एकता सोसायटीचा ठराव केलेला होता तुम्ही तो ठराव वाचून दाखवा.

**रोहिदास पाटील :-**

आमच्या गोषवाऱ्यामध्ये जे काही असेल ते यायला पाहिजे. असे तुम्हाला वाटत नाही का?

**शशिकांत भोईर :-**

गोषवाऱ्यामध्ये काहीही आलेले नाही. गोषवाऱ्यामध्ये सर्व काही यायला पाहिजे.

**रोहिदास पाटील :-**

जी लोक तीस वर्षे काम करतात. त्यांना अनेक वर्षाचा अनुभव आहे असे काहीही आलेले नाही. तुम्ही फक्त दोन ओळी लिहून देतात.

**मा. सभापती सो :-**

तीन वर्षाच्या अनुभवाचे मेन्शन केलेले आहे.

**रोहिदास पाटील :-**

ह्याच्यामध्ये तसा उल्लेख केलेला नाही.

**दिपक खांबित :-**

गोषवारा सुस्पष्टपणे दिलेला आहे. त्याच्यामुळे ह्याच्यामध्ये स्पष्ट काहीही दिलेले नाही.

**रतन पाटील :-**

साहेब, तसे नाही. गोषवारा अपूर्ण आहे. परिहंत सेवा संघ जळणासाठी लाकडे पुरवते.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ती संस्था सन २००० पासुन त्याठिकाणी काम करते. त्याची मुदत संपलेली आहे. आणि आता त्यांना तीन वर्षाची मुदत द्यायची आहे.

**नगरसचिव :-**

मी दि. २७/१२/२००२ राजीच्या ठराव क्र. ७१ चे वाचन करतो. (ठरावाचे वाचन केले.) या ठरावाचे सुचक सौ. ज्योत्स्ना हसनाळे आणि अनुमोदक श्री. शशिकांत शाह आहेत.

**शशिकांत भोईर :-**

परंतु, त्याच्यामध्ये नमुद केलेले नाही की आपण 'ना नफा ना तोटा' तत्त्वावर देणार आहोत की नाही.

**रोहिदास पाटील :-**

हा ठराव झाला. आपण ह्याच्यानंतर त्याला बंद केला. श्री. खांबितसाहेब, तुम्ही ह्याचे व्यवस्थित उत्तर द्या.

**शशिकांत भोईर :-**

ती लोक लाकडाचे काय भाव लावतात? परिहित संस्था रु. १२००/- घेते आता रु.१२००/- की रु.१५००/- घेते ते माहित नाही.

**तुळशीदास म्हात्रे :-**

तुम्ही आता त्यांच्याकडून किती पैसे घेतो लेखी घ्या.

**रोहिदास पाटील :-**

तुमच्या करारनाम्यामध्ये काही अटीशर्ती पाहिजेत.

**दिपक खांबित :-**

अटीशर्ती आहेत.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही आम्हाला करारनाम्याबाबत माहिती द्या मग आम्ही तुम्हा प्रश्न विचारणार नाही.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

तुम्ही त्याच्यामध्ये पैसे टाकण्यापेक्षा रिझनेबल मार्केट प्राईज घ्यावी लागेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

'नो प्रॉफिट नो लॉस' मध्ये काम करावे.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

सर्वसाधारणपणे मार्केट प्राईजमध्ये लाकडे पुरवावीत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

'नो प्रॉफिट नो लॉस' तत्त्वावर काम करा.

**दिपक खांबित :-**

आपली ॲग्रीमेंट 'नो प्रॉफिट नो लॉस' तत्त्वावरील आहे. जर तसे काही असेल तर तुम्ही लेखी तक्रार करा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

जर कोणाच्या तक्रारी आल्या तर प्रस्ताव फेर विचारासाठी याठिकाणी सादर केला जाईल.

**रोहिदास पाटील :-**

आता काम बंद होते की चालू होते.

**मा. सभापती सो :-**

सद्ध्या काम चालू होते.

**रोहिदास पाटील :-**

परंतु, आता काम बंद होते.

**मा. सभापती सो :-**

आता काम चालू होते.

**रोहिदास पाटील :-**

तुमची टिपणी काय बोलते?

**जयंत पाटील :-**

ज्याने पैसे किती भरले? त्याच्यावर 'ना नफा ना तोटा' तत्त्व अवलंबून आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, मागच्या सभेमध्ये हा विषय आलेला होता. आपण विद्युत दाहिनी बसविण्याच्या विषयावर मागच्या वेळेला चर्चा केली होती.

**जयंत पाटील :-**

सद्ध्या आपल्याकडे लोडशेडींग चालू आहे.

**मा. सभापती सो :-**

तुम्ही बोलता ते कॉस्टली आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

तो स्मशानातील मृत व्यक्तींचे दहन करणारा माणूस किती पैसे घेतो? रु. दोन हजार घेतो की रु. एक हजार घेतो ते तुम्ही सांगत नाही.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही त्याबद्दल काहीही बोलत नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, त्याची एकदासुद्धा कम्प्लेंट आलेली नाही.

**जयंत पाटील :-**

'ना नफा ना तोटा' याचा अर्थ काहीही होउ शकत नाही.

**दिपक खांबित :-**

तिथे प्रेत दहन करणारा माणूस रु. पाचशे घेतो.

**शशिकांत भोईर :-**

त्यामाणसाकडून रु. पाचशे घेतले जातात.

**मा. सभापती सो :-**

तो माणूस रु. पाचशे न घेता रु. सहाशे घेतो.

**दिपक खांबित :-**

तो माणूस भाईंदरला रु. सहाशे घेतो. भाईंदर वेस्ट ला ८०० रूपये आणि मिरारोडला रु. १२००/- घेतो.

**जयंत पाटील :-**

तुम्ही अंमलबजावणीसाठी तसे बोर्ड मागवून घ्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

ते जे बोर्ड लावतात त्यासाठी महापालिकेच्या नावाने परवानगी म्हणून संबंधीत संस्थेचे बोर्ड लावावेत असे माझे मत आहे.

**रतन पाटील :-**

त्याच्यावर दरसुचीसुद्धा लावण्यात यावी.

**जयंत पाटील :-**

दरसुचीसुद्धा लावा.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आतापर्यंत दोन वर्षामध्ये जवळजवळ सन २००० पासून काही तक्रारी आलेल्या आहेत का?

**फॅरो ग्रिटा :-**

बोर्ड रस्त्यामध्ये लावलेले आहेत.

**तुळशीदास म्हात्रे :-**

मी याठिकाणी एक सुचना मांडतो की, ज्या स्मशानभूमीवर जो भाव असेल त्याप्रमाणे नगरपालिकेने फलक लावावेत. जेणेकरुन लोकांचा प्रक्षोभ वाढणार नाही. इथे वेगळे बोर्ड, तिथे वेगळे बोर्ड असे कशाला करायचे?

**मा. सभापती सो. :-**

इथे वेगळी आणि तीथे वेगळी असे आहे का?

**रतन पाटील :-**

श्री. खतगांवकर साहेब, तुमची गोडदेव आणि नवघर स्मशानभुमीबाबत काय भुमिका आहे? ते स्पष्ट करा. कारण त्याठिकाणी विकासाचे काम झालेले नाही. आपण आता महापालिकेच्यावतीने संस्थेला विकसीत करायला दिलेले आहे. ते काम कुठपर्यंत आलेले आहे? ते सांगा.

**दिपक खांबित :-**

आपण हा विषय महासभेमध्ये आणलेला असताना त्यांनी स्थगिती आणलेली होती. गोडदेव आणि नवघर स्मशानभुमीबाबत आदर्श सेवा मंडळाकडून पझेशन काढून घेण्याबाबत न्यायालयाची स्थगिती आहे.

**रतन पाटील :-**

साहेब, त्याठिकाणी विकासाचे काम चालू आहे की बंद आहे? तिथे स्थगिती असल्यामुळे विकासाचे काम चालू आहे का? की महापालिकेला ते काम करू द्यायचे नाही ते सांगा.

**रोहिदास पाटील :-**

आता सन्मा. सदस्य जयंत पाटील हे सन्मा. सदस्य रतन पाटीलयांच्या वॉर्ड बाबत बोलले तर सन्मा. सदस्य रतन पाटील यांना ते चालते.

**दिपक खांबित :-**

ते काम संथ गतीने चालू आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

नवघर आणि गोडदेव स्मशानभुमीचे काय झाले?

**दिपक खांबित :-**

त्याला न्यायालयाची स्थगिती आहे.

**तुळशीदास म्हात्रे :-**

तुम्हाला स्थगिती बोलून मिरा भाईंदरचे वाटोळे करायचे आहे का? असे कुठले न्यायाधीश आहेत? कायमचे स्टे कसे देतात? तुमचा स्टे व्हॅकेट का होत नाही?

**एस. ए. खान :-**

तुम्ही विधी अधिकाऱ्यांना बोलवा.

**मा. सभापती सो :-**

आपण हा विषय पुढच्या मिटींगला घेउुया.

**दिपक खांबित :-**

तुम्ही हा विषय पुढच्या मिटींगला घेउुन निर्णय घ्या.

**जयंत पाटील :-**

तुम्ही स्थगिती आणली म्हणून नागरिक मयत जाळायला थांबले नाहीत. स्थगिती नेमकी कशावर आहे?

**तुळशीदास म्हात्रे :-**

मी नवघर स्मशानभुमीवर गेलेलो तर तेथील मयत घेउुन गेलेली लोक येथील नगरसेवक कोण आहे? असे विचारतात. ह्या ठिकाणी एक थेंबसुद्धा पाणी नसते.

**दिपक खांबित :-**

तुम्ही पुढच्या मिटींगला विषय घेउुन ठराव करा. आम्ही तुम्हाला ठराव करायला देउु.

**तुळशीदास म्हात्रे :-**

तुम्ही ठराव करायला वेळ लागेल. परंतु, आम्हाला सद्ध्या लोकांचे ऐकायला लागते त्याचे काय? आमच्याकडे आगरी व कोळी लोक आहेत. ती लोक मयताला गेल्यावर त्यांची चर्चा जास्त प्रमाणात होते.

**हंसुकुमार पांडे :-**

स्टे व्हेकंट करके छः महिनेमे सालमें डेव्हलप करके दिजिए। ऐसा टाईम दिजिए। क्योंकी वहाँ पर बहुत तकलिफ हाती है।

**जयंत पाटील :-**

तुम्ही त्यांना नोटिस द्या. त्यांना लवकरात लवकर स्मशानभुमीचा विकास करायला सांगा.

**हंसुकुमार पांडे :-**

स्मशानभुमीमध्ये लाईट, पाणी वगैरे काहीही नाही. त्यामुळे स्मशानभुमीचा विकास लवकरात लवकर करण्यात यावा असे मला वाटते.

**तुळशीदास म्हात्रे :-**

ज्या माणसाने स्मशानभुमीचा विकास करायला घेतलेला आहे आता तर त्याला खाण मिळालेली आहे. त्या माणसाने त्या खाणीवर सर्व काम होउन जाईल.

**रतन पाटील :-**

तुम्ही असे कसे बोलता? तुम्ही अभिनव विद्यामंदिरला खाण वगैरे बोलू नका. तुमची आमची संस्था आहे. परंतु, याठिकाणी तो विषय नाही. याठिकाणी जो विषय आहे तुम्ही तोच विषय काढा.

**मा. सभापती सो :-**

सदर ठराव सर्वानुमते मंजुर आहे.

**प्रकरण क्र. १४७ :-**

काशिमिरा स्मशानभुमीत लाकडे विक्री करीता ठेवणे तसेच अंत्यविधीचे साहित्य ठेवण्यास संस्थेस परवानगी देणेबाबत मंजुरी देणे.

**ठराव क्र. १५१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीत काशिमिरा स्मशानभुमित लाकडे विक्री करिता ठेवण्यास मे. साईनाथ एकता सोसायटी या संस्थेस मा. स्थायी समिती सभा दि. १७/१२/२००६ ठराव क्र. ७१ अन्वये ३ वर्षाकरिता परवानगी देण्यात आलेली होती. मे. साईनाथ एकता सोसायटी यांनी यापूढे सदर स्मशानभुमीत लाकडे विक्रीकरिता ठेवण्यास व सदर कामासोबत अंत्यविधीकरिता लागणारे साहित्य विक्रीकरिता ठेवण्यास परवानगी मागितलेली आहे. तरी सदर संस्थेस पुढील ३ वर्षे मुदती करिता करारनामा करून परवानगी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. रविंद्र माळी.** **अनुमोदकः- श्री. एस. ए. खान.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(नगरसचिवांनी प्रकरण क्र.१४८ चे वाचन केले.)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, आपण मागच्या वेळेला ५० ला मंजुरी दिलेली होती.

**जयंत पाटील :-**

परंतु, या विषयाचा गोषवारा नाही.

**नगरसचिव :-**

हा विषय सभापतींचा आहे.

**जयंत पाटील :-**

याठिकाणी असा विषय आहे की आपण अपंगांची भरती सुरु केलेली आहे. ते या शहरातील अपंग आहेत की, बाहेरुन आलेले आहेत. जो अपंग माणूस लुळा, पांगळा, लंगडा आहे तो माणूस नाशिकवरुन, कल्याणवरुन कसा येई

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

अपंगाची भरती मा. उच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे संपुर्ण महाराष्ट्रामध्ये आणि सर्व विभागात कम्पलसरी चालू आहे.

**जयंत पाटील :-**

तुम्ही भरती करु नका असे मी बोलत नाही.

**रतन पाटील :-**

परंतु, या भरतीमध्ये स्थानिक उमेदवारांचा समावेश झाला पाहिजे.

**जेन्वी अल्मेडा :-**

तुम्ही स्थानिक उमेदवारांना प्राधान्य द्या. ती लोक अपंग आहेत. म्हणजे ती लोक लांबुन येउु शकत नाही.

**जयंत पाटील :-**

तुम्ही अपंगांना रहायला देणार आहात की नाही ते प्रथम सांगा.

**जेन्वी अल्मेडा :-**

अपंग व्यक्ति ट्रॅव्हेलिंग वगैरे करु शकत नाही. म्हणून आपण आता जे अपंग घेतलेले आहेत त्याच्यामध्ये स्थानिकांना प्राधान्य द्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

स्थानिकांना प्राधान्य दिले जाईल.

**जयंत पाटील :-**

जी अपंग व्यक्ती लंगडी वगैरे आहे तुम्ही त्या व्यक्तींमधुन स्थानिकांना घ्या.

**बालाजी खतगांवकर (मा. उपायुक्त (मु.) सो.) :-**

आपण स्थानिकांना घेउु.

**जयंत पाटील :-**

आपल्याकडे अपंग उमेदवारांचे ॲप्लिकेशन येउु द्या. मग आपण ठरवूया.

**रोहिदास पाटील :-**

आपल्याकडे अपंग उमेदवारांचे ॲप्लिकेशन येउु द्या, त्या उमेदवारांचे इंटरव्ह्यू होउु द्या. मग जर महासभेची भावना असेल तर त्या उमेदवारांना घ्या.

**तुळशीदास म्हात्रे :-**

यामध्ये एक चूक झालेली आहे. एज्युकेटेड अपंग आहे. तिथे झाडू कामगाराचा विषय आलेला आहे तुम्ही त्यांना सफाई कामगार म्हणून अस्थापनेवर घेतलेले आहे. तर तो अपंग कचरा कसा काढणार? ते तुम्हीच सांगा.

**रोहिदास पाटील :-**

श्री. खतगांवकर साहेब, तुम्ही अस्पष्ट बोललात. तर शंका वाढेल म्हणून मी हे तुम्हाला सांगतो.

(सन्मा. सदस्या श्रीम. जेन्वी आल्मेडा ह्यांनी प्रकरण क्र. १४८ च्या ठरावाचे सभागृहासमोर वाचन केले.)

**रविंद्र माळी :-**

सदर ठरावास माझे अनुमोदन आहे.

**मा. सभापती सो :-**

सदर ठराव मंजुर आहे.

**प्रकरण क्र. १४८ :-**

महानगरपालिकेच्या आस्थापनेवर ठेकापद्धतीने लिपीक पुरवठा करणे कामी निविदा मागविणे व खर्चास प्रशासकीय / आर्थिक मान्यता देणे, तोपर्यंत जुन्या ठेकेदारास मुदतवाढ देणेबाबत निणर्य घेणे.

**ठराव क्र. १५१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर अत्यंत अपूरा कर्मचारी वर्ग असल्याने ठेकापद्धतीने मे. निमाजित एन्टरप्रायजेस ह्यांच्याकडून ५० लिपिक उपलब्ध करून घेतलेले होते. सदर ठेक्याची मुदत दि. ३०/११/२००६ रोजी संपलेली आहे. प्रशासनास दैनंदिन कामकाजाकरिता लिपिकांची आवश्यकता असून १०० लिपिक ठेक्याने घेण्यास येणाऱ्या खर्चास व निविदा मागविण्यास ही सभा मंजुरी देत आहे. तसेच नविन निविदा मागवून कार्यादेश देईपर्यंत मे. निमाजित एन्टरप्रायजेस यांच्या निविदांस मुदतवाढ देण्यात येत आहे.

**सुचक :- श्रीम. जेन्वी आल्मेडा.** **अनुमोदकः- श्री. रविंद्र माळी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, ह्याच्यामध्ये टेंडर काढताना एक अशी ॲडिशन करा की, जे अनुभवी ठेकेदार आहेत, ज्यांनी काम केलेले आहे. त्याला टेंडर काढतांना अनुभव असलेल्या ठेकेदाराला टेंडर द्यायचे ही अट टाकायला सांगा

**जयंत पाटील :-**

ठेकेदार अनुभवी असणे आवश्यक आहे असे म्हणण्यापेक्षा 'शासनमान्यता प्राप्त' हा शब्द टाका.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही अनुभव पाहिजे की सन्मा. सदस्य जयंत पाटील यांनी सांगितलेली अट पाहिजे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

त्या ठेकेदाराला अनुभव असणे आवश्यक आहे.

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही नक्की काय ठराव केला? तो आम्हाला सांगा. तम्ही ५० लिपीकांना मंजुरी दिलेली आहे की ७२ लिपीकांना मंजुरी दिलेली आहे. ते सुद्धा सांगा.

**मा. सभापती सो। :-**

आम्ही १०० लिपीकांना मंजुरी दिलेली आहे.

**जेन्वी अल्मेडा :-**

मी ठरावाचे वाचन केलेले आहे आणि त्याच्यामध्ये १०० लिपीकांना मंजुरी दिलेली आहे.

**रोहिदास पाटील :-**

ज्यांना पगार मिळालेला नाही ते लिपिक आणि अनुभव असलेले लिपिक हे दोन्ही लिपिक ह्याच्यामध्ये आलेले आहेत का?

**जेन्वी अल्मेडा :-**

दोन्ही लिपिक ह्याच्यामध्ये आलेले आहेत.

**मा. सभापती सो। :-**

ह्या ठरावामध्ये सर्व लिपिक आलेले आहेत आणि सर्व लिपिकांचा समावेश आहे.

**मा. सभापती सो। :-**

या सभेला उपस्थित असलेले सर्व सन्मा. सदस्य, सन्मा. सदस्या, मनपा अधिकारी वर्ग आणि मनपा कर्मचारीवर्ग आपण सर्वांनी ही सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडल्याबद्दल सर्वांचे हार्दिक आभार व्यक्त करुन आजची सभा संपल्याचे मी जाहीर करतो.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी १२.४० वा.**

**सही/-**
**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**